भारत सरकार सेवार्थ

# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.
दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com
Web Site : rdtenagpur.org.in फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

तातडीचे

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/प्राचार्य पद/२०११/ 2942

दि. 16 NOV 2011

प्रति,

प्राचार्य,
______________________
______________________
______________________
______________________
______________________

(सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था)

**विषय :– एनबीए ॲक्रीडीटेशन संदर्भात संस्थांना प्रोत्साहीत करण्याबाबत.**

**संदर्भ :– मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. १९/क्युएसेल/२०११/२१, दि. ८ नोव्हेंबर २०११.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या ॲक्रीडीअेशन बाबत असे निदर्शनास येते की, आपले संस्थेकडून अद्यापपर्यंत एनबीए ॲक्रीडीटेशन करीता अभ्यासक्रम अर्हताप्राप्त झालेला असतांना सुध्दा अर्ज दाखल केलेले नाहीत. तसेच ज्या संस्थांनी अर्ज दाखल केलेले आहेत त्यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे पाठपुरावा केलेला नसल्यामुळे जवळपास दोन तीन वर्षापासून एनबीए ॲक्रीडीटेशन संदर्भात सद्यस्थिती '' अर्ज दाखल केलेला आहे '' एवढेच निदर्शनास येते.

दिवसेंदिवस व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा–या संस्थांची संख्यात्मक वाढ झपाटयाने झालेल्या असल्यामुळे त्यांचे गुणात्मक दर्जाचे मुल्यांकन करणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. तरी याबाबत एनबीए ॲक्रीडीटेशन संदर्भातील सद्यस्थितीचे अवलोकन करून आपले संस्थेतील अभ्यासक्रमांचे एनबीए ॲक्रीडीटेशनसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडे पाठपुरावा करून अभ्यासक्रमांचे ॲक्रीडीटेशन करवून घ्यावे, व आपण केलेल्या कार्यवाहीचा परिणामकारक सविस्तर अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करण्यांत यावा, जेणेकरून सदरहू ॲक्रीडीटेशन बाबत माहिती संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत :– १) प्रोग्रामर, सदरहू पत्र आपले कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावे.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. १९) यांना माहितीस सादर.

Instt. Letter